20-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 19-03-2025 22:30 Page 1



## निवडक

### हरमल पंचायत क्षेत्रातील २५ रोजी सोपो पावणी

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १९ :** येथील पंचायत क्षेत्रातील जत्रा व इतर सोपो कर पावणी मंगळवार दि. २५ रोजी सकाळी १०.३० वाजता पंचायत कार्यालयात होणार असल्याचे हरमलच्या उपसरपंच तथा प्रभारी सरपंच सोनाली माज्री यांनी कळविले आहे.

तरी या पावणीसाठी भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी वेळेत उपस्थित राहावे तसेच पावणीच्या अटी व नियमपत्रक कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे प्रभारी सरपंच सोनाली माज्री यांनी कळविले आहे.

### काणकोण भाजप मंडळाच्या नवीन समितीची निवड

टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. १९ :** काणकोण मतदारसंघ भाजप मंडळाची नवीन समिती काल काणकोणचे आमदार तथा सभापती रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत श्रीस्थळ येथील सरकारी विश्रामगृहावर घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आली.

नवीन समिती अशी आहे. अध्यक्ष – प्रभाकर गावकर, उपाध्यक्ष – शाबा नाईक गावकर, विंदा सतरकर, चंद्रकांत सुदीर, सरचिटणीस – दिवाकर पागी, संजीव तिळवे, सचिव – अशोक कुष्ठा गावकर, अंजली गांवकर, तन्वी कोमरपंत, खजिनदार – कुशवंत भगत, सदस्य – गणेश गावकर, विनय तुबकी, किशोर शेट, रजनिश कोमरपंत, रमाकांत नाईक गावकर, विकास प्रभू, लक्ष्मण पागी, जयेंद्र गावकर, कुशाली महाले, चंपा पागी, आनंद देसाई, सिद्धार्थ देसाई, रूपा म्हाळगो गावकर, सुप्रिया प्रेमानंद गावकर, आरती काणकोणकर, सुनील पैंगीणकर, स्टीव्हन रॉडिगस, निशा च्यारी, अजित लोलयेकर, अमिता पागी, रोशन पागी यांचा समावेश आहे. यावेळी बोलताना सभापती रमेश तवडकर यांनी २०२७ ची विधानसभा जिंकण्यासाठी आतापासूनच लक्ष दिले जात असल्याचे सांगितले. प्रभाकर गावकर, दिवाकर पागी यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. महेश नाईक यांनी शेवटी आभार मानले.

### हळर्ण येथे ३० रोजी पहिली अखिल गोवा भजन स्पर्धा

टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १९ :** गुढीपाडव्यानिमित्त ओम कला सांस्कृतिक केंद्र – हळर्णतर्फे रविविर दि. ३० रोजी संध्याकाळी ४ वाजता श्री सातेरी भुमिका मंदिर – हळर्ण येथे स्व. सुखाची हरी परब, स्व. काशिनाथ हरी परब, स्व. सखाराम हरी परब यांच्या स्मरणार्थ पहिली अखिल गोवा भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक रु. १०००१ व फिरता चषक, तसेच सन्मानचिन्ह, द्वितीय रु. ७००१ व सन्मानचिन्ह, तृतीय रु.५००१ व सन्मानचिन्ह, प्रथम उत्तेजनार्थ रु. ३००१ व सन्मानचिन्ह, द्वितीय रु. २००१ व सन्मानचिन्ह त्याचप्रमाणे उत्कृष्ट – पहिला अभंग, दुसरा अभंग, गवळण, गजर, संवादिनी वादक, पखवाज वादक सन्मान चिन्ह दिले जाणार आहे. या स्पर्धेत फक्त १० संघांना प्रवेश दिला जाईल. या स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५०० रुपये आकारले जातील, सादरीकरण करण्यात आल्यानंतर प्रवेश शुल्काचे ५०० रुपये परत देण्यात येतील. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी मकरंद परब (८९९९३२०९२३), राज परब (९२८४७९९४७२) तसेच गुगल पे साठी स्मितराज परब (८९९९०१३१३८) यांच्याशी संपर्क साधावा असे आयोजकातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

### कोठंबी–पाळी ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १९ :** कोठंबी–पाळी वीज ट्रान्सफॉर्मरवर गुरुवार दि. २० रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता यावेळेत नवीन वीज वाहिन्या घालायच्या असल्याने वरील वेळेत कोठंबी गावात येथे वीजपुरवठा असणार नाही.यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### गेलीन रेस्टॉरंट ट्रान्सफोरमरवर दुरुस्तसाठी उद्या खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** गेलीन रेस्टॉरंट ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २१ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत गेलीन रेस्टॉरंट, गार्डन व्ह्यू, जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता, सेंट एंथनी स्कुल, वर्दे वालावलीकर मार्ग आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### दिवाडी भागात आज, उद्या खंडित वीजपुरवठा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** ११ केव्ही दिवाडी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २० रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत सोनारवाडो, खुरीसवाडो नावेली, मदंत, फेटोरी, सीमवाडा आणि दिवाडी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे ११ केव्ही कुंभारजुवा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २१ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत संपूर्ण कुंभारजुवा भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### निकृष्ट दर्जाची आले लसूण पेस्ट विकल्याबद्दल दंड

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** अन्न आणि औषध प्रशासन संचालनालयाने उत्तर गोवा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी निकृष्ट दर्जाची लसूण पेस्ट विकल्याबद्दल अन्न व्यवसाय चालकांना दंड ठोठावल्याची माहिती दिली आहे. लसूण पेस्ट विक्री केल्याबद्दल मेसर्स शैलेंद्र ऋषी राज इंडस्ट्रीज इंडिया (आय) प्रायव्हेट लिमिटेड डी. क्रमांक १–६/१, शक्ती हाऊस, कंकनाडी बायपास रस्ता, मेंगलोर, महानगर पालिका भाग, दक्षिण कन्नड, कर्नाटक आणि श्री गंगाधर पुजारी (घाऊक विक्रेता) में. गंगा एन्टरप्रायझेस घर क्रमांक ५१/२२–ए चर्चवाडा, खोर्ली आणि श्री प्रविण कुमार, (किरकोळ विक्रेता) में बालाजी सुपर मार्केट, दुकान क्रमांक बी/२४, वॉर्ड क्रमांक ११, बेती रेईश मागोस बार्देश यांना अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी असलेल्या ॲसिटिक ॲसिडसह कमी दर्जाची आले लसूण पेस्टची विक्री केल्याबद्दल प्रत्येकी ५०,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी सुजाता शेटगावकर यांनी न्यायाधिकरण अधिकाऱ्यांकडे खटला दाखल केला आहे.

### वाहतूक सेवेला अत्यावश्यक सेवा कायद्याखाली संप करण्यास बंदी

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** गृह खात्याने राज्यातील जमिनीवरून किंवा जलमार्गे प्रवासी किंवा माल वाहतूक करणाऱ्या सर्व वाहतूक सेवांना कोणत्याही स्वरूपात संप करण्यास तात्काळ प्रतिबंधित करणारा आदेश जारी केला आहे. हा आदेश गोवा अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा, १९८८ (गोवा कायदा क्रमांक २०, १९८९) च्या कलम ३ च्या उप–कलम (१) अंतर्गत जारी करण्यात आला आहे आणि तो सहा महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहील.

# आगोंद कासव संवर्धन क्षेत्रातील ६७ व्यवसाय बंद करा

## उच्च न्यायालयाचे आदेश | उद्या होणार सुनावणी : व्यवसायिकांमध्ये प्रचंड खळबळ

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १९ :** आगोंद किनाऱ्यावरील कासव संवर्धन क्षेत्रात कार्यरत असलेल्या ६७ व्यावसायिक आस्थापनांना २४ तासांत बंद करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. हा आदेश आज मिळताच व्यवसायिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून, अनेक आस्थापन मालकांनी पुढे काय होणार, या भीतीने चर्चा सुरू केल्याचे दिसून आले.

कासव संवर्धन क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून पर्यटक निवास, रेस्टॉरंट्स, दुकाने आणि इतर व्यवसाय सुरळीत सुरू होते. मात्र, सीआरझेड (किनारा व्यवस्थापन विभाग), प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यटन खाते, अग्निशमन दल आणि आरोग्य विभागाकडून परवानगी मिळवणे व्यवसायिकांसाठी कठीण बनले होते. या पार्श्वभूमीवर उद्या (दि. २०) या प्रकरणाची सुनावणी होणार होती. मात्र, तत्पूर्वीच उच्च न्यायालयाने २४ तासांत व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले.

आल्केमिस्ट असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडने १७ ऑगस्ट २०२४ रोजी आगोंद पंचायत मंडळाला दिलेल्या निवेदनात सर्वे क्रमांक १०२/१, १०२/३, १०१/१९, १०१/१८, १०१/१४, १०१/७, १०१/६, १०१/३, १००/१३, १००/१, १००/३, १०२/७, १०१/२४, १०१/२३, १०१/२२, १०१/२१, १०१/२०, १०१/१६, १०१/१५, १०१/९, १०१/८, १०१/१७, १०१/१ आणि ११/७ या जागांसाठी तात्पुरते परवाने रद्द करण्याची मागणी केली होती. सदर क्षेत्र एकूण ५ हजार ३०० चौरस फुटांवर पसरले आहे.




आगोंद कासव संवर्धन क्षेत्रातील काही आस्थापनातील चित्रे.

व्यवसाय बंदीच्या आदेशानंतर अनेक व्यावसायिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. कासव संवर्धन क्षेत्र असल्याने जर आम्हाला व्यवसाय बंद करावा लागत असेल, तर आल्केमिस्ट असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीला येथे व्यवसाय करण्यास परवानगी कशी दिली जाईल? असा प्रश्न व्यावसायिकांनी उपस्थित केला आहे.

या संदर्भात काणकोणचे उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर यांना विचारणा केली असता, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ६७ आस्थापने २४ तासांत बंद करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने आदेशाची अंमलबजावणी तत्काळ सुरू केली आहे.

दरम्यान,आज (दि. २०) काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानात शिमगोत्सव पार पडणार आहे. शिर्षारांधणी हा अंगावर रोमांच आणणारा कार्यक्रम होणार असल्यामुळे मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवावा लागेल. अशा स्थितीत व्यवसाय बंदीच्या आदेशाची अंमलबजावणी कशी होईल, याबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

# काँग्रेसची मडगावमध्ये करवाढीविरोधात जागरूकता मोहीम सुरू

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १९ :** मडगाव महानगरपालिका परिषदेने (एमएमसी) प्रस्तावित कर आणि शुल्कवाढीविरोधात काँग्रेसने घरोघरी जाऊन व्यापक जागरूकता मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत फातोर्डा आणि कुडातरीच्या आमदारांशी भेट घेणे, सर्व वॉर्डांमध्ये बैठका आयोजित करणे आणि २८ मार्च रोजी महानगरपालिका इमारतीसमोर निषेध आंदोलन करणे अशी योजना आखण्यात आली आहे.

काँग्रेस नेते सॅव्हियो कुतिन्हो, ॲड. स्नेहल ओंस्कर, लिंकन गोम्स, अझीझ शाह, अनिल अल्वारेस, कॅमिलो कॅमारा, सुजाता पार्सेकर, मारिया दो कार्मो परेरा आणि डोमनिक कौटिन्हो यांनी जब तक डीके है, तब तक वसुली सिर्फ करदाते से असा मथळा असलेला बॅनर हातात घेऊन मडगावमधील विविध व्यावसायिक प्रतिष्ठानांना भेट दिली. त्यांनी व्यावसायिकांना १ एप्रिल २०२५ नंतर लागू होणाऱ्या करवाढीमुळे येणाऱ्या अतिरिक्त आर्थिक भाराबाबत माहिती दिली आणि दर चार्टचे वितरण केले.

काँग्रेसने एमएमसीच्या अध्यक्षांवर तीव्र टीका केली आहे. अध्यक्षांनी प्रस्तावित दरवाढ केवळ २०% असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात ही वाढ ५०% ते ५००% दरम्यान असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. एमएमसीच्या अध्यक्षांनी अलीकडेच या दरवाढीचे समर्थन करताना ती दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे आणि इतर नगरपालिकांच्या तुलनेत कमी असल्याचे सांगितले होते.

ही दरवाढ म्हणजे 'थेट खंडणी' असून १ एप्रिलपासून ती पूर्ण गतीने लागू होईल, असा आरोप कुतिन्हो यांनी केला.

काँग्रेसने प्रस्तावित दरवाढ त्वरित मागे घेण्याची मागणी केली आहे. कुतिन्हो यांनी सूचित केले की,महापालिका हद्दीतील सर्व जागांचे सर्वेक्षण सुरू आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर अनअॅक्सेस्ड किंवा अनअॅन्स्ड जागेतून किती अतिरिक्त महसूल गोळा करता येईल हे स्पष्ट होईल. त्यानंतरच परिषदेला दरवाढ आवश्यक आहे की नाही, हे ठरवता येईल.

> **काँग्रेसने एमएमसीच्या अध्यक्षांवर तीव्र टीका केली आहे. अध्यक्षांनी प्रस्तावित दरवाढ केवळ २०% असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात ही वाढ ५०% ते ५००% दरम्यान असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.**

कुतिन्हो यांनी आणखी आरोप करत म्हटले की, अध्यक्षांनीच रेकॉर्डवर सांगितले आहे की त्यांच्या स्वतःच्या प्रभागात ४०% परिसरांकडे व्यापार परवाने नाहीत आणि ते बेकायदेशीररित्या कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत प्रथम या अनधिकृत व्यवसायांना कर जाळ्यात आणणे गरजेचे आहे. तोपर्यंत भाडेवाढ करण्याचे कारण नाही.

या जागरूकता मोहिमेद्वारे आम्ही करदात्यांना संभाव्य आर्थिक परिणामांबद्दल सावध करू इच्छितो. आम्हाला आशा आहे की एमएमसीने जनतेचा विरोध लक्षात घेऊन ही प्रस्तावित दरवाढ मागे घ्यावी, असे कुतिन्हो यांनी स्पष्ट केले.

# व्यापार परवाना सक्तीविरोधात दक्षिण गोवा ॲडव्होकेट्स असोसिएशनचा विरोध

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १९ :** दक्षिण गोवा ॲडव्होकेट्स असोसिएशन ने मडगाव नगर परिषदच्या वकिलांच्या कार्यालयांसाठी व्यापार परवाना सक्तीच्या निर्णयाला जोरदार विरोध केला आहे. कायदेशीर व्यवसाय हा व्यावसायिक उपक्रम किंवा व्यापार नाही, असे सांगत असोसिएशनने एमएमसी ला हा निर्णय मागे घेण्याची औपचारिक विनंती केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा दाखला देत हा निर्णय कायदेशीरदृष्ट्या चुकीचा असल्याचे दक्षिण गोवा ॲडव्होकेट्स असोसिएशनचे म्हणणे आहे.

एसजीएए अध्यक्ष ॲड. प्रसाद नाईक यांनी सांगितले की, दक्षिण गोव्यातील सहा तालुक्यांमध्ये प्रॅक्टिस करणाऱ्या ८५० हून अधिक वकिलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एसजीएए ला असा निर्णय मूलभूतपणे चुकीचा आणि कायद्याला धरून नसल्याचे वाटते. वकिलांना व्यापार परवाना मिळविण्याची गरज असल्याच्या एमएमसीच्या नोटीसा

केवळ चुकीच्या नाहीत, तर सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलेल्या कायदेशीर तत्त्वांच्या विरोधातही आहेत.

एसजीएए ने सर्वोच्च न्यायालयाच्या व्ही. शशिधरन विरुद्ध पीटर आणि करुणाकर आणि एम.पी. वीज मंडळ विरुद्ध शिव नारायण या निकालांचा हवाला दिला आहे. या प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने कायदेशीर व्यवसायाला व्यावसायिक क्रियाकलाप मानले जाऊ शकत नाही, असा निर्णय दिला होता. एसजीएए ने या निकालांच्या प्रती एमएमसीला दिलेल्या

याचिकेसोबत सादर केल्या आहेत.

दरम्यान, एमएमसी चे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी परिषदेला वकिलांच्या कार्यालयांसाठी व्यापार परवाना आकारण्याचा अधिकार असल्याचा पुनरुच्चार केला.एमएमसी च्या उपनियमांनुसार हा निर्णय योग्य आहे. वकिलांना व्यापार परवाना घेण्यास भाग पाडले जाईल. जर त्यांनी याला विरोध केला, तर त्यांनी न्यायालयात दाद मागावी, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले.

एसजीएएने एमएमसीला अधिकृत स्पष्टीकरण देण्याची आणि वकिलांना व्यापार परवाना देण्याची सक्ती करणाऱ्या नोटिसा तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. या निर्णयाला फक्त कायदेशीर वर्तुळातूनच नव्हे, तर इतर व्यावसायिक गटांकडूनही विरोध होत आहे. मडगावमध्ये प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांनीही एमएमसी च्या या निर्णयाला आक्षेप घेतला आहे. वैद्यकीय व्यवसाय हा व्यावसायिक क्रियाकलाप नाही, असे सांगत त्यांनी व्यापार परवाना सक्तीविरोधात भूमिका घेतली आहे.

# जूनसवाडा मांद्रे येथील लोखंडी पूल धोकादायक

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १९ :** मांद्रे पंचायत क्षेत्रातील जुनस वाडा फॉरेस्ट पार्क जवळ जुनस नदीवर असलेला लोखंडी पूल धोकादायक स्थितीत बनत आहे. याकडे सरकारचे दुर्लक्ष झाल्यामुळे भविष्यात एखादा अपघात घडला, तर त्याला जबाबदार कोण? असेल त्यासाठी या पुलाची लवकरात लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी अनिल पाटील या पर्यटकांनी या पुलावरून चालत जाताना त्याला थोड्या प्रमाणात इजा झाली त्याबद्दल ते बोलत होते.

जुनस नदीवर पलीकडे अरबी समुद्र आहे. त्यामुळे अरबी समुद्रात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी लाखो देश विदेशातील पर्यटक ये जा करीत होते. परंतु या जूनस नदीवरून पलीकडे जाण्यासाठी दुसरा मार्ग नसल्यामुळे काही पर्यटन हंगामात सॅक व्यवसायिक लाकडी हंगामी स्वरूपाचे पदपुर उभारून आपापल्या ग्राहकांची नागरिकांची पर्यटकांची सोय करत होती. याची गंभीर दखल तत्कालीन मुख्यमंत्री प्राचार्य लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी घेऊन गोवा पर्यटन विकास महामंडळाच्या निधी अंतर्गत या पुलाची उभारणी केली. आणि देश विदेशातील पर्यटकाबरोबरच स्थानिक नागरिक स्थानिक व्यावसायिकांची एक चांगली सोय केल्यामुळे नागरिक आज समाधान व्यक्त करताना दिसतात. परंतु त्यानंतर या पूलाची उद्घाटन सोहळा झाल्यानंतर या पुलाकडे कुणीही ढुंकून पाहिले नाही. सध्या या पुलाच्या परिसरात जे पायी चालत जाण्यासाठी लोखंडाचे पत्र टकले होते. ते पत्रे ते जॉईंट सुटलेले आहेत. त्यामुळे या पुलावरून चालत जाताना नागरिक पर्यटकांना त्याचा बराच त्रास होतो. ठीक ठिकाणी पूल गंजलेल्या अवस्थेत आहे. याकडे पुलाचे लोकार्पण सोहळा झाल्यानंतर सात वर्षाच्या कालावधीत एकदाही रंगरंगोटी केलेली नाही. किंवा दुर्लक्ष दुरुस्तीकडे झालेल आहे. आमदार जीत आरोलकर यांनी या पुलाची लवकरात लवकर पाहणी करून सरकार दरबारी त्याची दुरुस्ती करून घ्यावी, अशी मागणी पर्यटक नागरिक करत आहेत.



मांद्रे : जूनसवाडा नदीवरील पुलाची स्थिती.

# कांदोळी बीचवरील बेकायदेशीर बांधकामाची तपासणी

टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १९ :** गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी कांदोळी बीचवरील कथित बेकायदेशीर काँक्रीट बांधकामाची तपासणी केली. कळंगुट कॉन्स्टिट्यून्सी फोरम (सीसीएफ) ने या बांधकामासंदर्भात तक्रारी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.



व्हायकिंग मीडिया अँड एंटरटेनमेंटने सर्वे क्रमांक ११२/१९ मधील दांडो,कांदोळी बीचवरील नो–डेव्हलपमेंट झोनमधील सीआरझेड १ अ परिसरात हे बांधकाम केल्याचा आरोप आहे.

सीसीएफ सदस्य ॲग्नेलो बॅरेटो यांनी स्थळ तपासणीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले, बांधकामादरम्यान समुद्रकिनाऱ्यावरील वाळूचे ढिगारे आणि वनस्पती नष्ट करण्यात आले आहेत. हे बांधकाम समुद्राला केवळ ३० मीटर अंतरावर असून, हे संपूर्णपणे बेकायदेशीर आहे. सरकारने हे बांधकाम त्वरित पाडण्याचे आदेश द्यावेत आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी.

बॅरेटो यांनी पुढे सांगितले की, या बांधकामामुळे सीआरझेड अधिसूचना आणि पर्यावरण संरक्षण कायदा ईपीएचे उल्लंघन झाले आहे. सीआरझेड नियमांनुसार संरक्षित पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात हस्तक्षेप केल्यामुळे हे गंभीर उल्लंघन आहे.

आम्ही यापूर्वी या सर्वे क्रमांकासंदर्भात सहा तक्रारी केल्या आहेत. हे प्रकरण सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. स्थळ तपासणीनंतर जर कोणतीही कारवाई झाली नाही, तर आम्ही पुन्हा कायदेशीर मार्ग अवलंबू, असा इशारा बॅरेटो यांनी दिला. गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी च्या अधिकाऱ्यांनी तपासणी अहवाल लवकरच सदस्य–सचिवांकडे सादर केला जाईल, अशी माहिती दिली.


